# प्रेसनोट

## सीसीटिव्हीचे सहाय्याने चोरटे गजाआड
## ऐटिएम मध्ये मदतीच्या बहाण्याने अनेक लोकांना फसवुण चोरी करणारे
## विश्रामबाग पोलीसांच्या जाळयात

दि. ११/१०/२०१७ रोजी फिर्यादी संध्या त्रिगुण रासने वय ४२ वर्षे रा. ३८ रास्ता पेठ, पुणे हया बॅक ऑफ बडोदाचे लक्ष्मी रोडवर असलेल्या ऐटिएम मध्ये पैसे भरण्याकरीता आल्या होत्या. त्यावेळेस दोन इसमांनी त्यांना मदत करण्याचे बहाण्याने त्यांचा पीन नंबर चोरून पाहून त्यांचे पडलेले ऐटिएम कार्ड उचलून देण्याचे बहाण्याने ते दुस-या मशीनवर स्वॅप करून १०,०००/- रु रोख काढून चोरुन नेलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि. नं. ४६६/२०१६ भा.द.वि.कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील दाखल गुन्ह्याचे ठिकाणाचे व घटनास्थळ व परीसरातातील असणारे कॅमे-याचे आधारे माहिती घेवून विश्रामबाग पोलीस ठाण्याकडील तपास पथकाला सीसीटिव्ही फुटेज मधील इसम हे १. आकाश उत्तम वैराट वय २७ वर्षे रा. गांधी नगर, विशाल मित्र मंडळाशेजारी देहूरोड, पुणे २. राज अंजनी बानोले वय २३ वर्षे रा. शितळा नंगर नंबर २, शिवाजी विदयालयासमोर, देहूरोड, पुणे मुळ गाव मु. पो. आदोनी ता. नानापुरम जि. कर्नुल राज्य आंध्रप्रदेश असून ते सध्या त्यांचे राहते घरी असल्याचे समजल्याने पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील व त्यांचे तपासपथकातील पोलीस स्टाफने त्यांना पकडून ताब्यात घेतले.

त्यांचेकडे केले तपासात नमुद आरोपी हे पुणे शहरात विविध ठिकाणी फिरून दोन पेक्षा जास्त ऐटिएम मशीन असलेल्या ऐटिएम रूममध्ये जावून मशीनवर व्यवहार करण्याचे बहाण्याने व ऐटिएम रूममध्ये आलेल्या लोकांना मदत करण्याचे बहाण्याने त्यांचा चोरुन पीन नंबर पाहून त्यांचे नकळत कार्ड दुस-या मशीनवर स्वॅप करून त्याव्दारे पैसे काढून चोरून नेत होते. तसेच त्यांनी पुण्यातील दहा ते १२ वेगवेगळया ऐटिएम मशीनमधून २५ पेक्षा जास्त लोकांना मदत करण्याचे बहाण्याने फसवणुक करून पैसे काढल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी अशा पदधतीने २५ पेक्षा जास्त गुन्हयांची कबुली दिली आहे.

नमुद आरोपीतांकडून दाखल गुन्हा करताना वापर केलेली ॲटो रिक्षा, तसेच रोख रक्कम असा मिळून एकुण ९०,०००/- चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

अशा कोणत्याही नागरीकांची फसवणुक झाली असल्यास नागरीकांनी विश्रामाबाग पोलीस ठाण्याशी संपर्क करावा. तसेच नागरीकांनी ऐटिएम मध्ये गेल्यानंतर आपल्या मागे कोणालाही उभे राहू देवू नये. कोणी विनाकरण ऐटिएम मध्ये घुटमळत असल्यास सिक्युरिटीशी संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात येत आहे.

वरील कामगिरी सहा. पोलीस आयुक्त शरद उगले यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अप्पासाहेब शेवाळे, पोलीस निरीक्षक गुन्हे अमृत मराठे, पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई राहूल पवार, चेतन शिरोळकर, धीरज पवार यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याकडिल पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे करीत आहेत.